# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २९/०७/२०२४ (सोमवार) सकाळ**

---

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद
## एकुण १९,००,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त

दिनांक २८/०७/२०२४ रोजी चे १४.०० वा. ते १५.३० वा. दरम्यान पोस्टे मौदा येथील स्टाफ पो.स्टे. हद्दीत स्टाफसह अवैध गोवंश वाहतूकीस आळा घालणेकरिता पेट्रोलिंग करीत असताना भंडारा कडुन नागपूरच्या दिशेने NH-53 महामार्गाने महेंद्रा बोलेरो पिकअप क्र. MH-40/BG -3285, MH-40/BG -4256 तसेच MH-35/K-4170 मधून अवैधरित्या निर्दयतेने म्हशीची वाहतूक होत असल्याची माहिती मिळाल्याने नमूद तिन्ही वाहनांना नाकाबंदी करून मौजा माथनी शिवारात माथनी टोल नाका येथे पकडून पाहणी केली असता महेंद्रा बोलेरो पिकअप क्र. MH-40/BG – 3285, MH-40/BG -4256 तसेच MH-35/K-4170 मध्ये एकूण २३ म्हशी व हेले अत्यंत निर्दयतेने कोंबून, आखूड दोरखंडाने बांधुन व जनावरांची चारापाण्याची कोणतीही व्यवस्था न करता घेऊन जातांना मिळून आल्याने तिन्ही बोलेरो चालक नामे— **१) रतन रामा बंबावले, वय ३० वर्ष रा. मानेगाव बाजार ता. जि. भंडारा २) विश्वकांत बंडुजी काडघाये वय ३० वर्ष रा. नांदोरा ता. जि. भंडारा ३) श्रीकांत महादेव पोहणकर वय २४ वर्ष रा. टाकळी ता. जि. भंडारा** यांना ताब्यात घेऊन त्याचे ताब्यातून तीन महेंद्र बोलेरो पिकअप किंमती १५,००,०००/— तसेच वाहनामधील एकूण २३ म्हशी व हेले एकूण किंमती ४,००,०००/— रू. असा एकूण १९,००,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून सदर वाहना मधील म्हशी व हेले योग्य व्यवस्थापनार्थ गोरक्षण केंद्र भंडारा येथे दाखल करण्यात आलेले आहे. गुन्ह्यातील तिन्ही आरोपीतांना सूचनापत्रावर सोडण्यात आले असून त्यांचे विरुद्ध कलम ११(१) (d) (f) (e) प्रा. छळ प्रति. अधि. १९६० अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली मा. उपविभागीय पो. अधिकारी साहेब कामठी विभाग, ठाणेदार व पो.नि. सतीशसिंह राजपूत, पोउपनी महेश बोथले पोहवा. संदीप कडू, गणेश मुदमाळी, रुपेश मुदमाळी, पोना. दिपक दरोडे, पोअ. अतिश गाढवे यांनी केली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर